# जयमल्हार सह्याद्री

नागरी सहकारी पतसंस्था मर्यादित

## चोवीसाव्या अधिमंडळाच्या वार्षिक सर्वसाधारण सभेची नोटीस

संस्थेच्या सर्व सभासदांना कळविण्यात येते की, संस्थेच्या अधिमंडळाची २४ वी वार्षिक सर्वसाधारण सभा **शुक्रवार, दि. १९/०९/२०२५** रोजी सायंकाळी ४.०० वा. संस्थेचे अध्यक्ष श्री. जनार्दन बजरंग झोरे यांचे अध्यक्षतेखाली सानपाडा देवस्थान ट्रस्ट, दत्त मंदिर, सानपाडा रेल्वे स्टेशन जवळ, सानपाडा, नवी मुंबई – ४०० ७०५ या ठिकाणी होणार आहे. तरी सर्व सभासदांनी सभेस उपस्थित रहावे, हि विनंती.

### सभेपुढील विषय

१. दि. ०१/०९/२०२४ रोजी झालेल्या २३ व्या अधिमंडळाच्या वार्षिक सभेचे इतिवृत्त वाचून कायम करणे.

२. संचालक मंडळाने सादर केलेला दि. ३१/०३/२०२५ अखेरचा वार्षिक अहवाल, नफा तोटा पत्रक व ताळेबंद पत्रकास मंजूरी देणे.

३. सन २०२४–२५ या अहवाल सालातील संचालक मंडळाने सुचविलेल्या नफा विभागणीस मंजूरी देणे व लाभांश जाहीर करणे.

४. सन २०२५–२६ च्या अंदाज पत्रकास मंजूरी देणे व गतवर्षात अंदाजपत्रकापेक्षा अधिक झालेल्या खर्चास मंजूरी देणे.

५. सन २०२४–२५ या आर्थिक वर्षाच्या वैधानिक लेखापरिक्षण अहवालाची नोंद घेणे.

६. सन २०२५–२६ या आर्थिक वर्षासाठी केलेल्या वैधानिक लेखापरिक्षकाची नेमणूक करणे व त्याचा मेहनताना ठरविणे.

७. सन २०२४–२५ या आर्थिक वर्षाच्या वैधानिक लेखापरिक्षणाच्या दोष दुरूस्ती अहवालाची नोंद घेणे.

८. अधिमंडळाच्या २४ व्या वार्षिक सर्वसाधारण सभेस अनुपस्थित असणाऱ्या सभासदांची अनुपस्थिती क्षमापित करणे.

९. सहकार कायद्यातील बदलास अनुसरुन सहकार खात्याने प्रसिध्द केलेल्या सुधारीत आदर्श उपविधीला (MODEL BYE-LAWS) मंजूरी देणे.

१०. मा. अध्यक्षांच्या परवानगीने येणाऱ्या इतर विषयांवर चर्चा करणे.

संचालक मंडळाच्या अनुज्ञेने

ठिकाण : मुंबई
दिनांक : ०२/०९/२०२५

सचिव
**श्री. भागुजी धोंडीबा झोरे**

### विशेष सूचना

१) गणसंख्येअभावी तहकूब झालेली सभा पोटनियमातील तरतुदीप्रमाणे त्याच दिवशी, त्याच ठिकाणी अर्ध्या तासाने घेण्यात येईल व अशा तहकूब झालेल्या सभेला गणसंख्येची आवश्यकता असणार नाही.

२) ज्या सभासदांना वार्षिक अहवाल/कामकाजासंबंधी काही सुचना करावयाच्या असल्यास त्यांनी सभेच्या तारखेपुर्वी ४ दिवस अगोदर पत्राद्वारे मुख्य कार्यालयात किंवा jaimalharpatsanstha@yahoo.com या ई–मेल वर पाठविण्यात याव्यात. आयत्यावेळी आलेल्या सुचना विचारात घेतल्या जाणार नाहीत.

३) रु. १००० पेक्षा कमी भाग धारण करणाऱ्या सभासदांनी १०० चा एक भाग प्रमाणे किमान १० भागांची रक्कम रु. १०००/– भरणा करावी.

४) आपल्या पत्त्यातील बदल व मोबाईल क्रमांक त्वरीत नजीकच्या शाखा कार्यालयात कळवावा.

५) ज्या सभासदांनी KYC पूर्तता केली नाही, अशा सभासदांनी KYC पूर्तता करावी.